


# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com    RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे    अंक : २८७ वा    गुरूवार दि २९ जानेवारी २०२६    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये

# लाडक्या अजितदादाला अलविदा...

## महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची धक्कादायक एक्झिट..



**राज्याचे उपमुख्यमंत्री  यांचे बारामती इथं झालेल्या विमान अपघातात निधन झालं असून त्यांच्या अकाली जाण्याने राज्यभर हळहळ व्यक्त केली जात आहे. मुंबईहून बारामतीकडे येत असलेल्या अजित पवार यांचे विमान बारामती विमानतळापासून अवघ्या काही अंतरावर कोसळून हा अपघात  झाला.**

**वृत्तसंस्था/मुंबई**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातामध्ये निधन झाले आहे. बारामती विमानतळाजवळ लँडिगवेळी हा अपघात झाला. सकाळी ८.५० च्या सुमारास विमान लँडिग करत असताना हा अपघात झाला. या अपघातामध्ये एकूण पाच जणांचा मृत्यू झाला आहे. महाराष्ट्राचं लाकडं नेतृत्त्व असलेल्या दादांच्या अशा अकाली एक्झिटने सर्वांनाचा मोठा धक्का बसला आहे. अजित पवार हे सकाळी मुंबईहून पुण्याच्या दिशेने चालले होते. आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीच्या सभांसाठी ते निघाले होते. दादांच्या एकून चार सभा आज होणार होत्या. मात्र त्याआधीच काळाले घाला घातला. दादांच्या निधनाने देशभरात शोक व्यक्त केला जात आहे. अजित पवार यांच्यासह विमानामध्ये पाच जण होते. अजित पवार यांचा मुंबई पुण्यातील सगळा स्टाफ सुरक्षित आहे. केवळ मुंबईचे सुरक्षारक्षक विदीप जाधव हे अजित दादांसोबत होते . १) अजित पवार २) विदीप जाधव (अजित पवार यांचे खासगी सुरक्षारक्षक) ३) सुमित कपूर (पायलट कॅप्टन) ४) संभवी पाठक (कॅप्टन) ५) पिंकी माळी (फ्लाईट अटेंडंट अजित पवार यांच्या जाण्याने पवार कुटुंबाला सर्वात मोठा धक्का बसला आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनी दादांच्या जाण्यानंतर आपल्या व्हाट्सअॅप स्टेटसला असे लिहिले आहे. दादांच्या निधनानंतर आज बारामती बंद ठेवली गेली आहे. अजित पवार यांनी महापालिका निवडणुकीमध्ये आपली सर्व ताकद लावली होती. पायाला भिंगरी बांधल्यासारखा त्यांनी जितका वेळ मिळेल तितका प्रचार केला होता. आजसुद्धा दादा आगामी निवडणुकीच्या सभांसाठी जात होते. बारामती येथे त्यांची सभा होणार होती. मात्र नियतीने घात केला महाराष्ट्राचा नेता हिरावून घेतला. दरम्यान, अजित पवार यांचे सुपुत्र जय पवार यांचा विवाह ५ डिसेंबरला बहरीन येथे पार पडला. मुलाच्या लग्नाला दोन महिनेही झाले नाहीत आणि दादांचं अकाली निधन झालं. महाराष्ट्रचं दादा नेतृत्त्व आज हरपलं आहे

## दादांच्या मृत्यूबाबत शरद पवारांपासून आधी लपवलेलं



पवार कुटुंबातील सदस्यांना ही माहिती बातम्यांच्या माध्यमातून आणि अधिकाऱ्यांच्या माध्यमातून अचानक कळली. मात्र शरद पवार यांना याबाबत सुरुवातीला कोणत्याही प्रकारची माहिती देण्यात आलेली नव्हती. ब्रीच कँडी येथे बुधवारी त्यांची नियमित तपासणी झाल्यानंतर डॉक्टरांच्या उपस्थितीत त्यांना या दुर्दैवी घटनेची माहिती देण्यात आल्याचे समजते.

## शेवटच्या क्षणी ही घड्याळयाचीच साथ... हातावरील त्या घड्याळामुळे अजित पवार यांची ओळख पटली

.उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मृतदेहाची ओळख ही त्यांच्या घडाळ्यावरून करण्यात आली आहे. अपघातानंतर घटनास्थळी मृतांची ओळख पटवण्यासाठी वैयक्तिक वस्तूंचा आधार घेतला जात असल्याची माहिती समोर येत आहे. प्राथमिक वृत्तांनुसार, या प्रक्रियेत काही मृतांची ओळख त्यांच्या अंगावरील वस्तू, दागिने आणि घड्याळांच्या आधारे लावण्यात



आल्याचे सांगितले जात आहे. याच पार्श्वभूमीवर, काही माध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार अजित पवार यांचे महागडे घड्याळ हे ओळख पटवण्यासाठी एक महत्त्वाचा आधार ठरल्याचा दावा केला जात आहे.

# ठाकरे बंधू आत्मपरीक्षण करणार का?



मुंबईसह महाराष्ट्रातील इतरही महानगरपालिकांच्या निवडणुका अखेर पार पडल्या. भारतीय जनता पक्षाने जवळपास निम्मे नगरसेवक निवडून आणताना २९ पैकी २३ महापालिकांमध्ये स्वबळावर किंवा सहकारी पक्षाच्या मदतीने महापौर निवडता येईल इतके बहुमतही मिळविले, भाजप सर्वांत मोठा पक्ष ठरला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या विजयाचे शिल्पकार ठरले. सर्वाधिक उत्कंठा होती ती मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीची; त्यातही उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना कशी कामगिरी करते याची. ठाकरे यांच्या पक्षाला मुंबई महापालिकेतील सत्ता गमवावी लागली. मुंबईत भाजपला स्वबळावर महापौर निवडता येणार नसला तरीही एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेशी असलेल्या युतीच्या मदतीने मुंबईत महापौरपद व सर्व सत्तापदे मिळविण्यामध्ये भाजप यशस्वी ठरणार हे स्पष्ट झाले आहे. साहजिकच आता प्रश्न आहे, उद्धव बाळासाहेब ठाकरे व त्यांचा पक्ष आत्मपरीक्षण करणार का? मुंबई महानगरपालिकेवर शिवसेनेने गेली पंचवीस वर्षे सत्ता गाजविली. अर्थात या सर्व वेळेस भारतीय जनता पक्षाशी त्यांची युती होती, या युतीमध्ये भाजप नेहमीच लहान भावाच्या भूमिकेत राहिला. उपमहापौरपद व एखाद्या समितीचे अध्यक्षपद यापलीकडे भाजपच्या हातात काहीच आले नाही. इतकेच कशाला, २०१७ च्या निवडणुकीमध्ये शिवसेनेचे ८४ तर भाजपचे ८२ नगरसेवक निवडून आल्यानंतर भाजपने त्या पदांवरील हक्क सोडून सर्व पदे शिवसेनेला देऊ केली होती. त्यानंतर झालेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांपर्यंत युती कायम होती; पण २०१९मध्ये उद्धव ठाकरे यांनी निकालानंतर थेट काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यासोबत आघाडी करीत महाराष्ट्रात सत्ता स्थापन केली आणि या युतीमध्ये बिघाड झाला. त्यापूर्वी २०१४च्या विधानसभा निवडणुकीमध्येही युतीमध्ये बिघाडी झाली होती, पण त्यानंतर सावरून घेण्याचीच भूमिका भाजपने घेतली होती. साहजिकच या निवडणुकीमध्ये काय होणार, असा प्रश्न होता. भाजप व शिवसेना युतीने उद्धव बाळासाहेब ठाकरे व राज ठाकरे यांच्या शिवसेना व मनसे आघाडीवर निर्विवाद विजय मिळवून या प्रश्नाचे उत्तर दिले. उद्धव ठाकरे यांच्या नगरसेवकांची संख्या गेल्या निवडणुकीपेक्षा कमी म्हणजे ६५ पर्यंत घसरली. राज ठाकरे यांची कामगिरीही घसरून सहापर्यंत आली. त्यांच्या आघाडीला ७१ जागा मिळाल्या. भाजपने गेल्या निवडणुकीपेक्षा सात जागा अधिक जिंकल्या. शिंदे यांच्या शिवसेनेशी त्यांची युती होती. त्यामुळे शिंदेंच्या २९ जागा या देखील भाजपच्या बाजूने मोजल्या, तर ८९ अधिक २९ म्हणजेच ११८ जागा होतात. साहजिकच आकड्यांच्या भाषेमध्ये ठाकरे बंधूंची पीछेहाट झाली. अर्थात हे फक्त मुंबईत नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातले चित्र आहे. राज ठाकरे यांच्या मनसेची स्थिती त्याहून बिकट आहे. वास्तविक शिवसेना सातत्याने मराठी माणूस, मराठी अस्मिता व मुंबईतील मराठी माणसाचे अस्तित्व या विषयावर संघर्ष करीत आली आहे, किंबहुना त्या पक्षाची उभारणीच या विचारावर झाली आहे. या निवडणुकीमध्ये तब्बल अठरा वर्षांनी दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आले. त्यांनी मुंबईतील मराठी माणसाच्या अस्तित्वाची लढाई आहे म्हणून साथ द्या, अशी साद घातली. मराठीबहुल भागामध्ये शिवसेनेला मराठी मतदारांनी साथ दिलीही. पण त्यामुळे उर्वरित मुंबईमधून शिवसेनेला नेहमी मिळणारी साथ या वेळेस मिळाली नाही. मराठी विरुद्ध अमराठी असे झालेले ध्रुवीकरण हे भाजपच्या फायद्याचे ठरले आणि शिवसेनेने स्वतःचे नुकसान करून घेतले. टोकाला जाऊन मराठी अस्तित्वाची लढाई येथपर्यंत कथानक नेल्याने, आता यापुढे काय, असा प्रश्नही निर्माण होतो. ठाकरे बंधूंनी आपली शेवटची हुंडी वटविण्याचा प्रयत्न केला, त्याला मर्यादित यश आले. खरे तर ठाकरे बंधूंकडे भरपूर वेळ होता. निवडणुका फ ेब्रुवारीअखेरपर्यंत घ्या, असे न्यायालयाने जाहीर करण्यापूर्वीही महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार हे सगळ्यांना माहीत होते. या दोन बंधूंनी एकत्र निवडणूक लढवायची हे जूनमध्येच ठरविले होते. पण तपशील ठरविण्यासाठी त्यांना सहा महिने लागले. बहुधा दोन्ही ठाकरे एकत्र आले म्हणून मराठी माणूस भारावून जाऊन त्यांना भरभरून मतदान करील, अशी त्यांची अपेक्षा होती; पण तसे घडले नाही. मुंबईत असलेले शाखांचे जाळे ही शिवसेनेची ताकद होती. गेल्या वेळेस निवडून आलेल्या ८४ नगरसेवकांपैकी निम्मे नगरसेवक शिंदे यांच्या पक्षात गेले होते. हे जाळे खिळखिळे झाल्याची जाणीव ठाकरे बंधूंना होती. विधानसभा निवडणुकीमध्ये त्याचे परिणामही त्यांनी भोगले होते. तरीही हे जाळे पुन्हा विणण्यासाठी कोणतेही प्रयत्न करताना ठाकरे दिसले नाहीत. अगदी प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यामध्ये शाखा भेटींना प्रारंभ झाला. वास्तविक उद्धव व आदित्य ठाकरे यांनी ठरविले असते तर गेल्या वर्षभरात त्यांना हे जाळे पूर्ववत करणे शक्य होते, पण तसे घडले नाही. बहुधा आपण लोकांमध्ये मिसळलो तर आपली ब्रँड व्हॅल्यूफ कमी होईल, असे त्यांना वाटले असावे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# लांबलेल्या मुंबई महापौर निवडीवर फडणवीसांचं स्पष्टीकरण, कधी एकत्र..

**मुंबई :** 'गटनोंदणीबाबत शिवसेना आणि भाजप एकत्र बसूनच निर्णय घेणार आहोत. महापौर- उपमहापौरपदांबरोबरच इतर पदे आणि समित्यांवरील जास्तीत जास्त सदस्यपदांसाठी महायुतीची चाचपणी सुरू आहे', असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी स्पष्ट केले.मुंबई महापालिका निवडणूक होऊन १० दिवस उलटल्यानंतरही भाजप आणि शिवसेनेकडून गटनोंदणी करण्यात आलेली नाही. यासंदर्भात बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी, 'महापालिकांचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर आता गटनोंदणी सुरू आहे. गट स्थापन करताना त्याच्या पर्सेटाइलचा विचार करावा लागतो. कधी एकत्र नोंदणी करून फायदा असतो, तर कधी वेगळी करून फायदा होतो.महापौर-



उपमहापौर ही पदे वगळून इतर पदे तुमच्या एकूण संख्याबळाच्या पर्सेंटाइलवर ठरतात. स्थायी समितीत जास्तीत जास्त सदस्य येण्यासाठी काय व्यूहरचना आखता येईल, याचा अंदाज घेण्याचा प्रयत्न सुरू आहे', असे सांगितले. 'दोन्ही गटांची एकत्र नोंदणी किंवा वेगळी नोंदणी किंवा एक छोटा गट त्यांच्यासोबत नोंदणी करायची, या सर्व शक्यतांचा विचार करत आहोत. आम्ही एकत्रित बसूनच निर्णय घेऊ. बहुतांश महापालिकांमध्ये महायुतीचीच सत्ता येईल', असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. 'मुंबईच्या महापौरपदाचा निर्णय आम्ही एकत्र बसूनच घेऊ', असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.दरम्यान, शिवसेनेकडून कोकण भवन येथे स्वतंत्र गटनोंदणी करण्याचा निर्णय मंगळवारी घेण्यात आला. मात्र, नंतर तो अचानक मागे घेण्यात आला. त्यानंतर भाजप-शिवसेनेची एकत्रित गटनोंदणी करण्यावर चर्चा करण्यात आली. एकत्रित गटनोंदणीमुळे मुंबई महापालिकेतील स्थायी समिती, सुधार समितीसह अन्य समित्यांतील सदस्य संख्यांची जुळवाजुळव करणे शक्य होणार आहे. यातून समितींच्या चाव्या आपोआप महायुतीकडे येणार आहेत.सुधार समितीवर एकूण २६ सदस्य संख्या असून भाजप-शिवसेनेची स्वतंत्र गटनोंदणी झाली असती तर महापालिकेतील कोटा व सूत्रानुसार अनुक्रमे १० आणि तीन अशी एकूण १३ सदस्यत्व मिळाले असते. तर, शिवसेनेला (उबाठा) आठ व मित्रपक्ष काँग्रेसला तीन, मनसेला एक आणि 'एमआयएम'ला एक सदस्यत्व मिळाले असते. त्यामुळे सुधार समितीत महायुतीचे १३ आणि उबाठा व मित्रपक्षांचे १३ सदस्य झाल्याने सुधार समितीच्या अध्यक्षपदासाठी निवडणूक घ्यावी लागली असती. यात महायुतीविरोधात एक मत पडले असते तरी समितीचे अध्यक्षपद जाण्याचा धोका महायुतीला होता. त्यामुळेच भाजप-शिवसेनेने एकत्रित नोंदणी करण्याचा निर्णय घेतला

## काँग्रेसची जोरदार तयारी; नेत्यावर लवकरच मोठी जबाबदारी?

**मुंबई :** भारतीय जनता पक्षाच्या ताकदीपुढे गलितगात्र झालेल्या काँग्रेसची अवस्था दिवसागणिक खालावत चालली आहे. मुख्यमंत्री पदासह महत्त्वाची मंत्रीपदं भूषवलेले अनेक नेते काँग्रेसला राम राम करुन भाजप मध्ये गेले. त्यामुळे काँग्रेसकडे नेतृत्वाची कमतरता आहे. २०२९ मध्ये भाजप स्वबळावर लढणार आहे. अशा परिस्थितीत भाजपशी दोन हात करण्यासाठी पक्षानं युवा चेहरा द्यावा, अशी चर्चा देशातील सर्वात जुन्या राजकीय पक्षात सुरु झाली आहे.काँग्रेसनं तरुण आणि कार्यक्षम चेहरा दिला, अशा व्यक्तीच्या हातात नेतृत्व दिलं, तर पक्षाला २०२९ मध्ये पुनरागमनाची संधी असल्याची चर्चा पक्षात जोर धरु लागली आहे. आमदार आणि माजी मंत्री अमित देशमुख यांच्यासारख्या चेहऱ्याला काँग्रेसनं संधी द्यावी, अशी चर्चा सुरु झाली आहे. द न्यू इंडियन एक्स्प्रेसनं याबद्दलचं वृत्त दिलं आहे. आमदार अमित देशमुख यांनी लातूर महापालिका निवडणुकीत काँग्रेसचं नेतृत्व केलं. तिथे पक्षाला बहुमत मिळालं आहे. महापालिकेत अन्य कोणत्याही पक्षाच्या पाठिंब्याशिवाय काँग्रेसचा महापौर होणार आहे. याच यशाचा दाखला देशमुख यांचं नाव पुढे



करताना दिला जात आहे.अमित देशमुख यांच्याकडे मोठा राजकीय वारसा आहे. त्यांचे वडील दिवंगत विलासराव देशमुख मुख्यमंत्री होते. अमित देशमुख लातूर शहर विधानसभा मतदारसंघातून सलग चारवेळा आमदार झाले आहेत. २००९ पासून ते सातत्यानं निवडून येत आहेत. विशेष म्हणजे काँग्रेसच्या नेतृत्वालादेखील अमित देशमुख यांच्यावर विश्वास आहे. देशमुख राज्यातील काँग्रेसमध्ये सकारात्मक बदल घडवतील, असा विश्वास नेतृत्त्वाला आहे. पण त्यांच्याकडे राज्याची जबाबदारी कधी दिली जाणार, याबद्दल अद्याप तरी निर्णय झालेला नाही.१६ जानेवारीला राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका झाल्या. १७ जानेवारीला निकाल जाहीर झाले. भाजपनं १९ महापालिकांमध्ये एकहाती सत्ता मिळवली. तर अन्य ६ महापालिकांमध्ये मित्रपक्षांच्या मदतीनं बहुमताचा आकडा गाठला.

## ट्रम्पसोबत युती होईल, पण शिवसैनिकांसोबत नाही

**सोलापूर :** अक्कलकोट तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत महायुतीमधील धुसफूस आता चव्हाट्यावर आली आहे. 'भाजपची जगात डोनाल्ड ट्रम्प यांच्यासोबत युती होऊ शकते, पण शिवसेनेसोबत नाही,' अशा शब्दांत माजी गृहराज्यमंत्री आणि शिवसेना (शिंदे गट) नेते सिद्धाराम म्हेत्रे यांनी भाजपवर निशाणा साधला आहे. अक्कलकोटमध्ये भाजप आणि शिवसेना स्वतंत्र लढणार असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर म्हेत्रे यांनी भाजपच्या कार्यपद्धतीवर सडकून टीका केली.गेल्या चार वर्षांपासून अक्कलकोटमध्ये दबावाचे राजकारण सुरू असल्याचा आरोप म्हेत्रे यांनी केला. 'आमच्यासोबत एखादा कार्यकर्ता फिरला की पोलीस लगेच त्याच्यावर धाड टाकतात. आपले पोलीस स्कॉटलंड यार्डच्याही पुढे गेले आहेत का?' असा सवाल त्यांनी उपस्थित केला. पोलिसांच्या अति-तत्परतेवर उपरोधिक टोला लगावताना ते म्हणाले, 'नासाच्या माध्यमातून अमेरिका चंद्रावर काय करतेय, हे पाहण्यासाठी आपल्या पोलिसांना तिकडे पाठवायला हवे. या पोलिसांबाबत आम्ही लवकरच मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करणार आहोत. ओबीसी आणि मागासवर्गीय समाजाच्या आरक्षणाबाबतही म्हेत्रे यांनी गंभीर इशारा दिला आहे.

## गणेश नाईकांना परवानगी द्या, आम्ही तयार आहोत : नरेश म्हस्के

**ठाणे :** राज्याचे वनमंत्री आणि भाजपचे नवी मुंबईतील नेते गणेश नाईक आणि शिवसेना यांच्यातील शाब्दिक चकमक महापालिका निवडणुकांच्या निकालानंतरही कायम आहे. 'दोनच दिवसांपूर्वी ठाण्यात पक्षाने परवानगी दिली, तर यांचे नामोनिशाण साफ करून दाखवेल', असे टीकास्त्र नाईक यांनी कोणाचेही नाव न घेता सोडले होते. त्याला सोमवारी शिवसेना खासदार आणि प्रवक्ते नरेश म्हस्के यांनी जोरदार प्रत्युत्तर देत नाईक यांना शिवसेनेचे नामोनिशाण मिटवून टाकण्याची परवानगी द्यावीच, आमची तयारी आहे, असे प्रतिआव्हान दिल्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे.शिवसेनेचे खासदार नरेश म्हस्के यांनी 'एक्स' पोस्टद्वारे भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना जाहीर पत्र लिहून याप्रश्नी खदखद व्यक्त केली आहे. 'गणेश नाईक यांनी आपले मित्र पक्ष असलेल्या राज्य आणि अनेक महानगरपालिका, नगरपालिकांमध्ये सत्तेत सहभागी असलेल्या, युती म्हणून लढून युती म्हणून जिंकून आलेल्या शिवसेनेला संपवण्याचा विडा उचलला आहे. त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना अनेक वेळा डिवचून नवी मुंबईतून शिवसेनेला धोबीपछाड देण्याचे, टांगा पलटी करण्याचे



आणि शिवसेनेला नवी मुंबईतून मुळातून संपवून टाकण्याचे स्पष्ट इरादे जाहीररित्या मांडले आहेत', असे म्हस्के यांनी नमूद केले आहे.रविंद्र चव्हाण यांना नरेश म्हस्के यांनी विनंती करत नाईक यांच्या या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून परवानगी देण्याची विनंतीही म्हस्के यांनी केली आहे. 'युती असताना युतीतल्या मोठ्या घटक पक्षाबद्दल असे विधान करणे म्हणजे आपल्या पक्ष नेतृत्वावरच अविश्वास दाखवण्यासारखे आहे. एखाद्या व्यक्तीवरचा राग समजू शकतो परंतु, त्यासाठी पक्ष, पक्षीय भूमिका, पक्षाचा अजेंडा या सगळ्या बाबी धुडकावून लावत गणेश नाईक हे आमचे नामोनिशाण मिटवण्याचे वक्तव्य करीत आहेत', हे या पत्रातून म्हस्के यांनी नमूद केले आहेखरे म्हणजे, महाराष्ट्रात महाबिघाडीची सत्ता उलथवून टाकण्यात भारतीय जनता पक्ष आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या दोघांची मोठी भूमिका राहिली आहे.

## अंजली भारतीला अमृता फडणवीसांवरील वक्तव्य भोवणार? भाजपची मागणी

**नागपूर :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने आयोजित भीम मेळाव्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नीविषयी आक्षेपार्ह व अत्यंत खालच्या पातळीचे वक्तव्य केल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून, या घटनेचा भारतीय जनता पक्षाच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला आहे. भीम गायिका म्हणून ओळख असलेल्या अंजली भारती हिने भंडारा जिल्ह्यातील फुलमोगरा येथे झालेल्या भीम मेळावा कार्यक्रमादरम्यान केलेल्या वक्तव्यामुळे राजकीय व सामाजिक वतुर्ळात संताप व्यक्त होत आहे.भाजपचे प्रदेश प्रवक्ते आणि अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष अँड. धर्मपाल मेश्राम यांनी संबंधित महिला तसेच या कार्यक्रमाचे आयोजक



यांच्यावर कठोरातील कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. केवळ प्रसिद्धी मिळविण्याच्या जे हव्यासापोटी मर्यादा ओलांडून बोलणे आणि राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या पत्नीविषयी विखारी व अपमानास्पद शब्दांचा वापर करणे ही नीच मनोवृत्ती असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अशा वक्तव्यामुळे केवळ एका व्यक्तीचा नव्हे, तर संपूर्ण महिलावर्गाच्या सन्मानाला धक्का बसतो, असेही ते म्हणाले.अँड. मेश्राम पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमध्ये समता, सन्मान आणि माणुसकीला सर्वोच्च स्थान आहे. त्यांच्या नावाने सुरू असलेल्या कार्यक्रमात अशा प्रकारची असभ्य व अश्लील भाषा वापरणे म्हणजे बाबासाहेबांच्या विचारांना तिलांजली देण्यासारखे आहे. या प्रकारामुळे समाजात चुकीचा संदेश जात असून, अशा थिल्लर कार्यक्रमांना यापुढे कोणत्याही परिस्थितीत परवानगी देऊ नये, अशी मागणीही त्यांनी केली.प्रकरणानंतर स्थानिक पोलिसांनी तात्काळ दखल घ्यावी आणि कायद्याच्या चौकटीत राहून संबंधितांवर कारवाई करावी, अशी अपेक्षा भाजपकडून व्यक्त करण्यात आली आहे. सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गैरवापर करून कुणाच्याही वैयक्तिक आयुष्यावर किंवा महिलांच्या सन्मानावर आघात करण्यास मुळीच थारा दिला जाणार नाही, असा इशाराही अँड. मेश्राम यांनी दिला.

दरम्यान, या घटनेमुळे सामाजिक संघटना, महिला कार्यकर्त्या तसेच विविध स्तरांतून निषेध व्यक्त केला जात असून, सार्वजनिक कार्यक्रमांवर नियंत्रण ठेवण्याची आणि आयोजकांची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# घरासमोरच गाठलं अन दोघांनी.. सांगलीत अग्निशमन अधिकाऱ्यावर जीवघेणार हल्ला, प्रकृती चिंताजनक



[illegible]

## आईनेच ११ वर्षीय मुलाला निर्घृणपणे संपवलं ; मुलीचा आरडाओरडा





[illegible]

## कपडे बदलताना पत्नीने चाकू घेतला अन..

[illegible]

## तीन महिन्यांच्या लेकीने द्यावी मुखाग्नी, इतकं लिहून शिक्षिकेने जीव दिला



[illegible]

# पोटच्या गोळ्याचा आईनेच घेतला जीव, लेकीलाही संपवण्याचा प्रयत्न, पुणे हादरलं ; घटनेचं गूढ कायम




[illegible]


# खराब फॉर्ममुळे संजू वर्ल्ड कप खेळणार नाही? प्रशिक्षकाच्या विधानाची चर्चा




**मुंबई/वृत्तसंस्था :** भारतविरुद्ध न्यूझीलंड यांच्यात टी-२० मालिका सुरु आहे. या मालिकेतील चौथा सामना आज रंगणार आहे. विशाखापट्टणम येथे चौथा टी-२० सामना रंगेल. मालिकेतील तिन्ही सामने भारताने जिंकले आहेत आता उर्वरित दोन सामने शिल्लक आहेत. भारताने तीन सामने जिंकल्यामुळे मालिकाही आधीच जिंकली आहे. आता चौथा सामन्यापूर्वी पत्रकार परिषद झाली. यात डरपक्षीं डरीप एक महत्त्वपूर्ण विधान करण्यात आलेपहिल्या तीन सामन्यात धावा काढण्यात अपयशी ठरल्यानंतर सलामीवीर संजू सॅमसनच्या टी-२० विश्वचषकातील सहभागावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. गोलंदाजी प्रशिक्षक चीपश चीज्ञशश्र यांनी संघर्ष करणाऱ्या या फलंदाजाच्या फॉर्ममध्ये लवकर परत येण्यावर विश्वास व्यक्त केला. त्यांनी मंगळवारी, २७ जानेवारी रोजी सांगितले की, 'संजूच्या पुनरागमनासाठी आता फक्त एका चांगल्या डावाची आवश्यकता आहे.' सॅमसनने पहिल्या तीन टी-२० सामन्यांमध्ये फक्त १६ धावा केल्या आहेत, ज्याचा सर्वोच्च धावसंख्या १० आहे, तर अभिषेक शर्मा, इशान किशन आणि सूर्यकुमार यादव सारख्या इतर टॉप-ऑर्डर फलंदाजांनी न्यूझीलंडच्या गोलंदाजांवर वर्चस्व गाजवले आहे.चौथ्या टी-२० सामन्यापूर्वी मोर्केलने पत्रकारांना सांगितले की, 'संजू हा आत्मविश्वास आणि फॉर्म परत मिळवण्यापासून एक डाव दूर आहे. विश्वचषकाच्या तयारीत, खेळाडूंनी योग्य वेळी त्यांचा सर्वोत्तम फॉर्म परत मिळवणे महत्वाचे आहे. तो चांगला सराव करत आहे आणि चेंडू चांगला मारत आहे.'जरी तो एक पर्यायी सराव सत्र होता, तरी सॅमसनने नेटमध्ये ३० मिनिटांपेक्षा जास्त वेळ घालवला. त्याने अक्षर पटेल, वरुण चक्रवर्ती, अभिषेक आणि साईड-आर्मर रघु सारख्या गोलंदाजांचा सामना केला. सुरुवातीच्या काही संघर्षांनंतर, सॅमसनला त्याची लय सापडली आणि त्याने एसीए-व्हीडीसीए स्टेडियमवर चेंडू उडवण्यास सुरुवात केली. त्यानंतर श्रेयस अय्यर सराव करत असताना संजूने मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि फलंदाजी प्रशिक्षक सीतांशू कोटक यांच्याशी बराच वेळ चर्चा केली. मॉर्केलने आग्रह धरला की तो सॅमसनच्या फॉर्मबद्दल फारसा चिंतित नाही, तो म्हणाला की, 'वैयक्तिक कामगिरीपेक्षा संघाचा विजय महत्त्वाचा आहे. मला वाटते की तो लवकरच स्कोअरबोर्डवर मोठी धावसंख्या उभारेल. आमचे लक्ष संघ जिंकण्यावर आहे आणि तेच सर्वात महत्त्वाचे आहे. आम्ही सध्या मालिकेत ३-० ने पुढे आहोत आणि मुले खूप चांगले क्रिकेट खेळत आहेत. विश्वचषक सुरू होण्यापूर्वी आमचे काही सामने शिल्लक आहेत आणि मला विश्वास आहे की संजू त्याचा फॉर्म परत मिळवेल,'

## स्टार खेळाडू के. एल. राहुल टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेणार?

**मुंबई :** स्टार खेळाडू केएल राहुल सध्या टीम इंडियासाठी वन डे आणि कसोटी क्रिकेटमध्ये महत्त्वाचा खेळाडू आहे. वन डे सामन्यांमध्ये विकेटकीपर म्हणूनही जबाबदारीही सांभाळत आहे. मात्र तो टी-२० संघामध्ये नाही, विशेष म्हणजे २०२२ मध्ये राहुलने आपला शेवटचा सामना खेळला होता. त्यामुळे टी-२० क्रिकेटमधून लवकरच निवृत्ती जाहीर करणार असल्याच्या चर्चांनी जोर धरला होता. यासंदर्भात के.एल. राहुलने इंग्लंडचा माजी क्रिकेटपटू केविन पीटरसनसोबतच्या मुलाखतीत जाहीरपणे भाष्य केले आहे. केविन पीटरसनसोबतच्या मुलाखतीत राहुलने निवृत्तीनंतरच्या जीवनाबद्दल आणि मानसिकतेबद्दलही आपले विचार मांडले. त्याने सांगितले की, निवृत्तीनंतर कुटुंबासोबत वेळ घालवणे आणि जीवनाचा आनंद घेणे महत्त्वाचे आहे. क्रिकेटमधून मिळणाऱ्या पैशांमुळे भविष्यात आर्थिक चिंता राहणार नाही, याबद्दलही त्याने समाधान व्यक्त केले. राहुलच्या मते, खेळाडू म्हणून सर्वात



मोठे आव्हान हे मानसिक असते. जेव्हा खेळाडू शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या थकून जातो, तेव्हा निवृत्तीचा विचार मनात येतो. यावर मात करण्यासाठी स्वतःला समजावणे आणि जीवनातील इतर महत्त्वाच्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.मला नाही वाटत निवृत्तीचा निर्णय जास्त कठीण असेल. जर तुम्ही स्वतःशी प्रामाणिक असाल तर जेव्हा योग्य वेळ येईल तेव्हा हा निर्णय घेतला जाईल, उगाच लांबवण्याचा काही अर्थ नाही. निवृत्तीची वेळ अजून थोडी दूर असल्याचं के.एल. राहुलने म्हटलं आहे.राहुलने आतापर्यंत ६७ कसोटी, ९४ एकदिवसीय आणि ७२ टी२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत.

## दे दणादण.. वैभव सूर्यवंशीची तुफानी फटकेबाजी, फक्त ८ चेंडूंतच ४० धावा

**बुलोवायो/वृत्तसंस्था :** वैभव सूर्यवंशीच्या तुफानी फटकेबाजीचा नजराणा पुन्हा एकदा जगाला पाहायला मिळाला. १९ वर्षांखालील वर्ल्ड कपच्या सामन्यात वैभवने अशी दणकेबाज फलंदाजी केली की, गोलंदाजांच्या तोंडचे पाणी त्याने पळवले.वैभव सूर्यवंशी आतापर्यंत भन्नाट फॉर्मात असल्याचे सर्वांनी पाहिले आहे. या वर्षीच्या सुरुवातीला तर त्याने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावावर करत पाकिस्तानच्या बाबर आझमलाही मागे टाकले होते. वैभवने आपला हा फॉर्म कायम ठेवला आणि आता वर्ल्ड कपच्या आजच्या सामन्यात धडाकेबाज फटकेबाजीही केली. भारताचा सलामीवीर आरोन जॉर्ज हा २३ धावांवर बाद झाला, तर कर्णधार आयुष म्हात्रेला २१ धावा करता आल्या. त्यामुळे भारताला चांगली सुरुवात करता आली नव्हती. गोलंदाज भारताला बॅक्फूटवर ढकलण्यचाा प्रयत्न करत होते. पण वैभव सूर्यवंशीने यावेळी फक्त भारताचा डाव सावरला नाही तर त्यानेस संघाचा रवरेटही आपल्या फटकेबाजीच्या जोरावर चांगलाच वाढवला. वैभवने यावेळी फक्त आठ चेंडूतच ४० धावा केल्या होत्या.भारताचा हा सामना यजमान झिम्बाब्वेबरोबर सुरु होता. झिम्बाब्वे आपल्या घरच्या मैदानात खेळत असल्याने ते भरातावर दडपण टाकण्याचा प्रयत्न करत होते. पण यावेळी वैभव सूर्यवंशीने हे दडपम झुगारून दिले आणि धमाकेदार फटकेबाजी सुरुच ठेवली. वैभवच्या या फटकेबाजीच्या जोरावर भारताला १० षटकांत १०० धावा करता आल्या होत्या. वैभवने या सामन्यात फक्त २४ चेंडूंत आपले अर्धशतक पूर्ण केले. वैभव जोरदार



फटकेबाजी करत होता. पण यावेळी एक मोठा फटका मारण्याचा प्रयत्न करत असताना तो बाद झाला. वैभवने या सामन्यात ३० चेंडूंत चार चौकार आणि चार षटकारांच्या जोरावर ५२ धावांची खेळी साकारली आणि भारताला झुंजार सुरुवात करून दिली. वैभवचे हे या वर्ल्ड कपमधील दुसरे अर्धशतक ठरले आहे. वैभवने संघाला चांगली सुरुवात करून दिली, त्यामुळे त्यांना तिनशे धावांचा पल्ला गाठता आला.वैभव सूर्यवंशी जबरदस्त फॉर्मात आहे आणि वर्ल्ड कपच्या आजच्या सामन्यात त्याने हे सर्वांना दाखवून दिल्याचे पाहायला मिळाले आहे.

## सहा धावांत सहा विकेट्स साकारत भारताचा दिमाखदार विजय

**बुलोवायो/वृत्तसंस्था :** वैभव सूर्यवंशीची तुफानी फटकेबाजी, विहान मल्होत्राचे शतक आणि कर्णधार आयुष म्हात्रेच्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर भारताने १९ वर्षांखालील वर्ल्ड कपमध्ये दमदार विजय साकारला. भारताने धडाकेबाज फटकेबाजीच्या जोरावर ३०८ धावांचे मोठे आव्हान उभारले होते. त्यानंतर आयुष म्हात्रेच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर भारताने फक्त सहा धावांत सहा बळी मिळवले आणि भन्नाट विजय साकारला. भारताने या विजयासह आता वर्ल्ड कपच्या सेमी फायनलच्या दिशेने ठोस पाऊल टाकले आहे.भारताची या सामन्यात सुरुवात फारशी चांगली झाली नाही. आरोन जॉर्ज २३, तर आयुष २१



धावांवर बाद झाला. पण वैभव सूर्यवंशी मात्र यावेळी धमाकेदार फटकेबाजी करत होता. त्यामुळे भारताला १० षटकांतच शतकापर्यंत पोहोचता आले. वैभवने यावेळी दणकेबाज फटकेबाजी करताना फक्त २४ चेंडूंत आपले अर्धशतक साकारले. वैभव शतकाच्या दिशेने कूच करेल, असे वाटले होते, पण या सामन्या मात्र त्याला ही गोष्ट मजली नाही. वैभवने या सामन्यात ३० चेंडूंत ४ चौकार आणि चार षटकारांच्या जोरावर ५२ धावा केल्या. वैभव बाद झाल्यावर विहान मल्होत्राने भारताचा डाव सावरला. विहानने यावेळी झिब्माब्वेच्या संघाला भारताला पिछाडीवर ढकलू दिले नाही. विहानला यावेळी अभिग्यान कुंडूची चांगली साथ मिळाली. या सामन्यात जे वैभवला जमले नाही ते यावेळी विहानने करून दाखवले. विहानने या सामन्यात १०७ चेंडूंचा सामना करताना आपले शतक साजरे केले. विहानने सात चौकारांच्या जोरावर १०९ धावांची दमदार खेळी साकारली. विहानला यावेळी सुयोग्य साथ देणाऱ्या अभिग्यानने पाच चौकार आणि एका षटकाराच्या जोरावर ६१ धावांची खेळी केली. त्यामुळेच भारताला या सामन्यात ३०८ धावा करता आल्या.भारताच्या ३०९ धावांचा पाठलाग करणाऱ्या झिम्बाब्वेची सुरुवात चांगली झाली नाही. भारताने झिम्बाब्वेची ३ बा २४ अशी अवस्था केली होती. त्यानंतर झिम्बाब्वेचा संघ काही वेळ तग धरू शकला खरा. बांगलादेशची ४ बाद १४२ अशी अवस्था होती. त्यानंतर सहा धावांत भारताने त्यांच्या सहा फलंदाजांना बाद केले आणि २०४ धावांनी दमदार विजय साकारला. आयुषने यावेळी १४ धावांत तीन बली मिळवले.

# घरबसल्या मराठीत पाहता येणार 'कांतारा', खास प्रोमोही रीलिज ; जाणून घ्या कुठे आणि कधी ?



**मुंबई :** कांतारा- ए लिजेंड' हा अभिनेता ऋषभ शेट्टीचा लोकप्रिय सिनेमा २०२५ रोजी रीलिज झालेला. मुळ कन्नड भाषेतील या चित्रपटाने पॅन इंडिया विविध भाषांमध्ये तुफान कमाई केली. त्यानंकर झीळाश तळवशे वर हा सिनेमा चार भाषांमध्ये रीलिज झाला. पण आता पौराणिक कथेवर आधारित हा सिनेमा मराठीमध्येही पाहता येणार आहे. हा भव्यदिव्य सिनेमा मराठीत पाहण्याकरता थिएटरमध्ये जाण्याची किंवा ओटीटी सब्सक्रिप्शनचीही आवश्यकता नाही. घरबसल्या टीव्हीवर हा सिनेमा पाहता येईल. झी मराठी वाहिनीने याबाबत घोषणा केली आहे.पहिल्यांदाच आपल्या माय मराठीत पाहायला मिळणार 'कांतारा'', अशी कॅप्शन देत झी मराठीच्या अधिकृत सोशल मीडिया पेजवर हा प्रोमो शेअर करण्यात आला आहे. 'कांतारा'चा एक अख प्रोमोही या पोस्टमध्ये शेअर करण्यात आला. ज्यात असे म्हटले आहे की, 'झी मराठी प्रीमियर... दैवी ब्लॉकबस्टर... पहिल्यांदाच आपल्या मायमराठीत! झी मराठी प्रीमियर, कांतारा-ए लिजेंड... शनिवार, ३१ जानेवारी, दुपारी १ वाजता, झी मराठीवर.' झी मराठीने शेअर केलेल्या पोस्टवर शेकडो लाइक्स आले आहेत. तर कमेंट सेक्शनमध्येही काही नेटकऱ्यांनी उत्सुकता व्यक्त केली.दरम्यान होंबळे फिल्मच्या बॅनरअंतर्गत प्रदर्शित झालेल्या या सिनेमाचे दिग्दर्शनही ऋषभ शेट्टीने केले आहे. ऋषभसह यामध्ये जयराम, रुक्मिणी वसंत आणि गुलशन देवैया हे कलाकार महत्वाच्या भूमिकांमध्ये झळकले आहेत. २०२२ साली रीलिज झालेल्या 'कांतारा' या चित्रपटाचा हा प्रीक्वेल आहे. म्हणजेच 'कांतारा'मध्ये दाखवण्यात आलेल्या कथानकापूर्वीची कहाणी 'कांतारा- ए लिजेंड'मध्ये आहे. ऑक्टोबर २०२५ रोजी रीलिज झालेल्या 'कांतारा- ए लिजेंड'ने जगभरात ८५० कोटी रुपयांहून अधिक कमाई केली होती. यापैकी परदेशातील कमाई जवळपास ११० कोटींहून जास्त होती, तर बाकीची कमाई भारतात झाली आहे. गेल्यावर्षी सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांच्या यादीमध्ये या सिनेमाचा दुसरा क्रमांक लागतो. डिसेंबरमध्ये रीलिज झालेल्या 'धुरंधर'ने ऋषभच्या या पौराणिक सिनेमाला मागे टाकले.

## बिग बॉसच्या घरात कधी चावी तर कधी अंडी होताहेत चोरी



**मुंबई :** बिग बॉस मराठी ६ 'चा आता तिसरा आठवडा सुरू झाला आहे. तरीही बिग बॉसच्या घरात चोरी अजूनही काही थांबत नाहीये. पहिल्या आठवड्यात अनुश्री मानेनं सोनाली राऊतच्या पॉवर कीची चोरी केलेली. त्यानंतर तिनं स्वतःच याबद्दल घरातील सदस्यांना सांगितलं. आता तिसऱ्या आठवड्यात पुन्हा एकदा चोरी झाली आहे. त्यावरून बिग बॉसच्या घरात पुन्हा गोंधळ निर्माण झाला. यादरम्यान, अनुश्रीनं केलेलं वक्तव्य चर्चेत आलं आहे.कालच्या 'बिग बॉस मराठी ६'च्या घरात तिसऱ्या आठवड्यात पुन्हा चोरी होते. घरातील अंडी चोरीला जातात. प्रत्येक सदस्याच्या वाट्यातील २ अंडी गायब होतात. ओमकार, विशालचं नाव सांगतो. आयुष, सगळ्यांच्या कप्प्यांची तपासणी करायला सांगतो. मात्र, विशाल नकार देतो. पुढे, अनुश्री प्राजक्ताच्या बोलण्यावर उगाच नाटकं करत म्हणते, 'कशाला करायची चोरी, ही वृत्तीच मला पटत नाही' अनुश्री, शहाणपणा करते. आयुष, अनुश्री, ओमकार, सोनाली, विशाल आणि रुचिता, चोरीवरून चर्चा करत असतात. यावेळी अनुश्री म्हणते की, 'चोरी करायला पण हिंमत लागते.' अनुश्रीचा कोडगेपणा यावरून दिसून येतोय. त्यामुळे तिचं हे वक्तव्य चर्चेत आलंय.शेवटी, विशालनेच अंडी चोरलेली असतात आणि तो ती अंडी परत देतो. दिव्या म्हणते, 'आपल्या सीझनला चोरांचं सीझन असं नाव पडेल' रोशनला या गोष्टी पटत नाहीत. टोळीनं चोरी केल्यामुळे दिव्या त्यांच्यासाठी जेवण न बनवण्याचा निर्णय घेते.दरम्यान, कलर्स मराठीनं शेअर केलेल्या 'बिग बॉस मराठी ६'च्या प्रोमोमध्ये विशालचं बॉडीवॉश चोरीला जातं आणि त्याचा आळ तो आयुषवर टाकतो. त्यावरून बिग बॉसच्या घरात पुन्हा गोंधळ झालेला दिसत आहे.

## ७ अभिनेत्रींसोबत जोडलं नाव ; १३ वर्षांनी मोठ्या घटस्फोटित अभिनेत्रीसोबत अफेअर



**मुंबई :** बॉलिवूडमध्ये अनेक कलाकारांच्या अफेअर्सच्या चर्चा होतात. आज आपण अशाच एका अभिनेत्याबद्दल जाणून घेणार आहोत ज्याचं, एक, दोन किंवा तीन अभिनेत्रींशी नव्हे तर सात वेगवेगळ्या अभिनेत्रींशी अफेअर होतं. हा अभिनेता ४० वर्षांचा असून सिंगल आहे. त्यानं २०१२ मध्ये त्यानं इंडस्ट्रीत पदार्पण केलं, त्यानंतर त्याचा तेव्हापासून एकही चित्रपट यशस्वी झाला नाही. या अभिनेत्याला फ्लॉप म्हणून लेबल लावण्यात आलंय. या अभिनेत्याचं शेवटचं अफेअर घटस्फोटित अभिनेत्रींसोबत होतं.हा अभिनेता दुसरा-तिसरा कुणीही नसून अर्जुन कपूर आहे. अर्जुन मलायका अरोरासोबत अनेक वर्ष रिलेशनशिपमध्ये होता. मलायकाने अरबाज खानसोबत घटस्फोट झाला असून घटस्फोटाच्या फक्त दोन वर्षांनी ती अर्जुनसोबत रिलेशनशिपमध्ये आली. अर्जुन कपूर आणि मलायका अरोरा यांचा २०२४ मध्ये घटस्फोट झाला. अलिकडेच दिलेल्या एका मुलाखतीत मलायकाने अर्जुनला तिच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा भाग म्हटलं आणि अभिनेत्री म्हणाली की, ब्रेकअप झालेला असूनही, त्यांच्यात चांगली मैत्री आहे.मलायका अरोरासोबतच्या ब्रेकअपनंतर अर्जुनचं नाव कुशा कपिलासोबत जोडलं गेलं. २०२३ च्या अखेरीस आणि २०२४ मध्ये ते अनेक कार्यक्रमांमध्ये एकत्र दिसले. पण, अर्जुन आणि कुशाने या अफवा असल्याचं म्हटलं. अर्जुनने अलीकडेच दिलेल्या मुलाखतीत तो सिंगल आहे, असं म्हणाला.मलायका अरोरासोबत रिलेशनशिपमध्ये येण्याअगोदर अर्जुन कपूर सोनाक्षी सिन्हासोबत रिलेशनशिपमध्ये असल्याची अफवा पसरली होती. त्यांनी २०१५ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'तेवर' चित्रपटात एकत्र काम केलेलं. शुटिंगदरम्यान त्यांच्या अफ 'अरच्या चर्चा झाल्या. अर्जुनने नंतर सांगितलं की, पर्सनॅलिटीमध्ये फरक असल्यामुळे सिनेमा पूर्ण झाल्यानंतर त्यांचा ब्रेकअप झाला.अर्जुन कपूरचं आलिया भट्टसोबतही नाव जोडलं गेलं. त्यांनी '२ स्टेट्स' चित्रपटात एकत्र काम केलेलं. या काळात त्यांच्या अफेअरच्या अफवा सुरू झाल्या. पण, आलियानं नंतर सांगितलं की, ते फक्त चांगले मित्र होते. रिलेशनशिपच्या फक्त अफवा आहेत. अर्जुनचं नाव आलियाची बहीण शाहीन भट्टशी देखील गेलेलं, परंतु त्यात कोणतंही तथ्य आढळलं नाही. अर्जुन कपूरचं नाव परिणीती चोप्रासोबतही जोडलं गेलेलं. पण, त्यांनीही ते फक्त चांगले मित्र असल्याचं सांगितलं. अर्जुन कपूरचं सिरीयस रिलेशन सलमान खानची बहीण अर्पिता खानसोबत होतं. अर्जुन आणि अर्पिता दोन वर्षे डेट करत होते. अर्जुन त्यावेळी १८ वर्षांचा होता.

## चाहत्यांना मोठा धक्का ! यशाच्या शिखरावर असताना अरिजीत सिंहची मोठी घोषणा..



**मुंबई :** भारतीय संगीत विश्वातील लोकप्रिय गायक अरजीत सिंहच्या चाहत्यांसाठी सर्वात मोठी बातमी समोर आली आहे. गायकाने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत चाहत्यांना मोठा धक्का दिला. अरिजीतने जाहीर केले की, तो यापुढे पार्श्वगायन करणार नाही. गायकाने अशाप्रकारे घोषणा केल्यानंतर चाहत्यांसह संगीत विश्वातील कलाकार मंडळींना मोठा धक्का बसला आहे. गायकाची पोस्ट सोशल मीडियावर क्षणार्धात व्हायरल झाली आहे.अरिजीतने शेअरकेलेल्या पोस्टमध्ये असे लिहिले आहे की, 'नमस्कार, तुम्हा सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा. गेल्या काही वर्षांत मला इतके प्रेम देणाऱ्या माझ्या सर्व श्रोत्यांचे मी आभार मानू इच्छितो. मला हे आनंदाने जाहीर करतोय की आतापासून मी पार्श्वगायक म्हणून कोणतेही नवीन काम हाती घेणार नाही. मी ते इथेच थांबतो आहे. हा एक खूप सुंदर प्रवास होता.अरिजीतने शेअर केलेल्या पोस्टवर चाहत्यांसह कलाविश्वातीलमंडळींनी कमेंट केल्या आहेत. काहींनी त्याच्या या निर्णयासाठी त्याला शुभेच्छा दिल्या, तर काहींना जबर धक्का बसला आहे. यशाच्या शिखरावर असताना अरिजीतने घेतलेला हा निर्णय अनेकांसाठी धक्कादायक आहे. 'जाते नही कही रिश्ते पुराने...' या त्याच्याच गाण्यातील ओळी वापरुन एकाने कमेंट केली आहे, तर अन्य एकाने लिहिले की, 'लीजेंड्स कधीही गायब होत नाहीत, ते फक्त त्यांची वाट निवडतात.'

मंगळवारी रात्री साडेआठच्या सुमारास अरिजीतने ही पोस्ट शेअर केल्यानंतर क्षणार्धात त्यावर लाइक्स आणि कमेंटचा पाऊस पडला आहे. तासाभरातच या पोस्टवर ४४ लाखांच्या जवळपास लाइक्स आणि तेवढ्याच कमेंट आल्या आहेत. रात्री ९.३५ वाजेपर्यंत जवळपास ८ हजार युजर्सनी ही पोस्ट रिशेअर केली होती. अरिजीतच्या पोस्टवर यशराज मुखाटे, श्रीया पिळगांवकर, राधिका भिडे अशा अनेक कलाकारांनीअरिजीतच्या पोस्टवर कमेंट केल्या आहेत.

दरम्यान अरिजीतने तो पार्श्वगायन करणार नसल्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे तो स्वतंत्र म्युझिक अल्बम घेऊन येण्याची शक्यता आहे, शिवाय तो कॉन्सर्टमधून प्रेक्षकांच्या भेटीला येतो. संगीतकार म्हणूनही त्याची वेगळी बाजू पाहायला मिळू शकते.

# युनानी औषधी ने किडनी स्टोन लघवीतून बाहेर पडल्या...

## दीर्घकालीन फिशरसारख्या समस्यांवर युनानी औषधे गुणकारी आहेः डॉ. कमर खान

**जनसंचलन/ बुलढाणा**

बुलडाणा जिल्ह्यातील सुप्रसिद्ध युनानी चिकित्सा डॉ. कमर खान म्हणाले की युनानी औषधे दीर्घकालीन आजारांवर गुणकारी आहेत. युनानी चिकित्सा पद्धतीमध्ये अनेक औषधे आणि उपचार आहेत जे दीर्घकालीन आजारांवर प्रभावी आहेत. युनानी औषधे प्राकृतिक तत्वांपासून बनविली जातात, ज्यामुळे ते सुरक्षित आणि प्रभावी आहेत. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार आणि डॉ. भागवत भुसारी यांनी आव्हान केले की बुलडाणा जिल्हा सामान्य रुग्णालयातील आयुष्य विभागात युनानी औषधींचा लाभ घ्यावा.

डॉ. कमर खान यांनी असंख्य लोकांच्या मुतखडा औषधी ने लघवीतून बाहेर काढले आहे. मुतखड्यात जास्त काळ खडे राहिल्यास त्याचा इतर अवयवांवर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे या दुखण्यापासून मुक्त होण्यासाठी डॉक्टर आपल्याला जास्त



पाणी पिण्याचा सल्ला देतात आणि वेदना सुरू झाल्यावर डॉक्टरांनी सांगितल्यानुसार काही युनानी औषधे घेण्याचाही सल्ला दिला जातो.

मूत्रमार्गात मुतखडा जमा झाल्यास भविष्यात लघवीशी संबंधित अनेक समस्या उद्भवू शकतात. एखाद्या व्यक्तीला किडनी स्टोन झाल्यानंतर खूप वेदना होतात. हा एक असा आजार आहे जो आपल्या मूत्राशयाशी संबंधित आहे आणि किडनी स्टोन कोणालाही कधीही होऊ शकतो.

किडनी स्टोन हे खनिज आणि आम्ल मिठाचे साठे आहेत जे एकाग्र मूत्रात एकत्र बांधतात. मूत्रमार्गातून जाताना ते अस्वस्थ होऊ शकतात, परंतु ते क्वचितच कायमचे नुकसान करतात. किडनी स्टोन साधारणपणे जोपर्यंत तुमच्या किडनीमध्ये फिरत नाही किंवा तुमच्या मूत्रवाहिनीत प्रवेश करत नाही तुमची मूत्रपिंड आणि मूत्राशय यांना जोडणाऱ्या नळ्यामध्ये प्रवेश करत नाही तोपर्यंत लक्षणे निर्माण करत नाहीत. जर ते मूत्रवाहिनीमध्ये अडकले तर ते लघवीच्या प्रवाहात अडथळा आणू शकते, ज्यामुळे मूत्रपिंड मोठे होते आणि मूत्रवाहिनीला उबळ येते, या दोन्ही गोष्टी अत्यंत वेदनादायक असू शकतात.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | गुंतवणुक रक्कम ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


# शेगाव दिंडीहून परतताना काळाचा घाला

## धावत्या ट्रॅक्टरखाली चिरडून जवानाचा दुर्दैवी मृत्यू



**जनसंचलन/ शेगाव**

शेगाव येथे संत गजानन महाराजांच्या दर्शनासाठी गेलेल्या पायी दिंडीतील एका २५ वर्षीय तरुणाचा परतीच्या प्रवासात भीषण अपघात होऊन मृत्यू झाला. महेश गजानन व्यवहारे (रा. विठ्ठलवाडी) असे या मृत युवकाचे नाव असून, तो महाराष्ट्र सुरक्षा बलात () जवान म्हणून कार्यरत होता. या घटनेमुळे विठ्ठलवाडी गावावर शोककळा पसरली असून गावाने गुरुवारी चूल न पेटवता आपला शोक व्यक्त केला. मिळालेल्या माहितीनुसार, डोणगाव जवळील विठ्ठलवाडी येथील ७० ते ८० भाविकांची पायी दिंडी २३ जानेवारी रोजी शेगावसाठी रवाना झाली होती. २७ जानेवारी रोजी सर्व भाविकांनी श्रींचे दर्शन घेतले आणि सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास सर्वजण सोबत आणलेल्या ट्रॅक्टरमध्ये बसून घराकडे परतत होते. शेगाव येथील आनंद सागर परिसराजवळ ही दुर्घटना घडली. ट्रॅक्टर मार्गस्थ असताना महेश व्यवहारे हा एका चालत्या ट्रॅक्टरवरून दुसऱ्या ट्रॅक्टरवर जाण्याचा प्रयत्न करत होता. यावेळी अचानक त्याचा पाय घसरला आणि तो थेट धावत्या ट्रॅक्टरच्या चाकाखाली आला. या भीषण अपघातात त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. सोबत असलेल्या सहकाऱ्यांनी त्याला तत्काळ जवळच्या रुग्णालयात दाखल केले, मात्र डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले. एका हसत्याखेळत्या तरुणाचा असा दुर्दैवी अंत झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# दादा नाहीत शोकात बुडाला बुलढाणा सर्वपक्षीय कडकडीत बंद...

जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्राच्या राजकारणात दबदबा, निर्णयक्षम नेतृत्व आणि दादा म्हणून ओळख असलेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात दुर्दैवी निधन झाल्याने संपूर्ण राज्य हादरून गेले आहे. बारामती विमानतळावर लँडिंगदरम्यान घडलेल्या या भीषण दुर्घटनेत दादांचे प्राण गेले आणि महाराष्ट्राने एक कणखर, बेधडक नेता गमावला. या हृदयद्रावक घटनेच्या निषेधार्थ व दादांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी बुलढाणा जिल्ह्यात आज सर्वपक्षीय कडकडीत बंदचे आवाहन करण्यात आले आहे. राजकीय मतभेद विसरून सर्व पक्ष एकत्र आले असून, हा निर्णय राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष टी.डी. अंभोरे, राष्ट्रवादी (शरद पवार गट)चे जिल्हाध्यक्ष नरेश शेळके, काँग्रेसचे शहराध्यक्ष दत्ताभाऊ काकस, भाजप नेते दत्ताभाऊ पाटील, चंद्रकांत बर्दे, महादेव शेळके, अनिल बावस्कर, बबलू कुरेशी, सुजित देशमुख,



सुनील सोनुने यांच्या संयुक्त बैठकीत घेण्यात आला. आज सकाळपासूनच बुलढाणा जिल्ह्यात बाजारपेठा, व्यापारी आस्थापना, खासगी व्यवहार स्वयंस्फूर्तीने बंद ठेवण्यात आले असून, सर्वत्र शोकाकुल वातावरण आहे. दादांचा थेटपणा, जनतेसाठीचा संघर्ष आणि निर्भीड निर्णयशक्ती इतिहासात अजरामर राहील. बुलढाण्याने आज अश्रूंनी आपल्या दादांना अखेरचा सलाम केला आहे.

# रातोरात बीअरबार रिकामा! देऊळगाव राजा येथे अज्ञात चोरट्यांचा मोठा डल्ला

जनसंचलन/ देऊळगाव राजा

शहरातील जाफराबाद रोडवरील प्रतीक नामक बीअरबार फोडून अज्ञात चोरट्यांनी तब्बल २ लाख २९ हजार रुपयांहून अधिक किमतीचा मुद्देमाल चोरून नेल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. या धाडसी चोरीमुळे देऊळगाव राजा शहरातील कायदा-सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या प्रकरणी जनार्धन बाबुराव शिवरकर (वय ४०, व्यवसाय बीअरबार मालक, रा. शिंगणे गनर, ता. देऊळगाव राजा) यांनी देऊळगाव राजा पोलीस ठाण्यात तोंडी रिपोर्ट दाखल केला आहे. २४ जानेवारी रोजी रात्री ९.३० वाजता बीअरबार बंद करून घरी गेले असता, दुसऱ्या दिवशी सकाळी ९.३० वाजता मॅनेजर समाधान बोबडे बार उघडण्यासाठी गेले असता शटरचे कुलूप कापलेले आढळले. बारमध्ये प्रवेश केल्यानंतर संपूर्ण सामान अस्ताव्यस्त, काऊंटरचे ड्रॉवर उघडे, रोख रक्कम गायब आणि गोडाऊनचा कोंडा तुटलेला असल्याचे स्पष्ट झाले. तपासणीत २०६,७५४ रुपयांची विदेशी दारू,३,००० रुपयांचा , तसेच २०,००० रुपयांचे ६ कॅमेरे फोडून नुकसानबकेल्याचे निष्पन्न झाले. एकूण नुकसान २,२९,७५४ रुपये असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. घटनेची माहिती मिळताच दारूबंदी विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले असून पंचनामा करण्यात आला आहे. मात्र, च फोडून चोरटे पसार झाल्याने तपासाला मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

# श्री शिवाजी विद्यालय रायपूर येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



जनसंचलन/बुलढाणा

स्व. मंजुळाई कोरडे पाटील ग्रामीण विकास बहुउद्देशीय संस्था संचलित श्री शिवाजी विद्यालय रायपूर येथे २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. संस्थेचे सचिव श्री एकनाथरावजी कोरडे यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा सौ. मीनाताई कोरडे पाटील उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या ओजस्वी भाषणांनी, देशभक्तीपर गीतांनी उपस्थितांमध्ये राष्ट्रप्रेमाची ज्वाला पेटवली. संगीत कवायत व लेझिम पथकाच्या शिस्तबद्ध आणि जोशपूर्ण सादरीकरणाने कार्यक्रमाला विशेष रंगत आणली. कार्यक्रमास श्री रामराव सिरसाठ, सूर्याजी सिरसाठ, रमेश सिरसाठ तसेच संस्थेचे उपाध्यक्ष शुभम एकनाथरावजी कोरडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी केलेले परिश्रम कौतुकास्पद ठरले.

# फोनवर बोललो भेट ठरली होती अन् दादा गेले! राधेश्याम चांडकांची वेदना



जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्राचे लोकप्रिय नेते उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या अपघातातील निधनाच्या वृत्तानंतर बुलढाण्यात शोककळा पसरली असून, बुलढाणा अर्बनचे सर्वेसर्वा राधेश्याम चांडक यांनी अत्यंत भावनिक शब्दांत आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. ही बातमी ऐकल्यावर क्षणभर विश्वासच बसला नाही. महाराष्ट्राने एक अचूक, व वेळेवर निर्णय घेणारा नेता गमावला आहे, असे चांडक म्हणाले. अजितदादांशी असलेल्या दीर्घ सहवासाचा उल्लेख करताना त्यांनी अनेक आठवणींना उजाळा दिला. माझा आणि अजितदादांचा सतत संपर्क होता. सहकार, साखर कारखाने, नगरपालिका निवडणूकी दरम्यान आणि अनेकदा चर्चा व्हायची, असे त्यांनी सांगितले. एक प्रसंग सांगताना ते म्हणाले, ‍‌‍‍‍एकदा दादांचा हेलिकॉप्टर बिघाडामुळे अजितदादा तब्बल पाच तास सहकार शाळेत थांबले होते. साधेपणा आणि माणुसकी हेच त्यांचे मोठे वैशिष्ट्य होते. चार दिवसांपूर्वीच फोनवर संवाद झाल्याचेही त्यांनी नमूद केले. मुंबईला भेटायला बोलावले होते. अशा क्षणी हे घडावे, हे अतिशय वेदनादायक आहे, असे ते म्हणाले. अजितदादांसारखा नेता महाराष्ट्रात पुन्हा होणे कठीण आहे, अशा शब्दांत चांडक कुटुंबीय व बुलढाणा अर्बन परिवाराकडून त्यांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८